पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. २९१० दि. ०६/०९/२०१९**

**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**चंदननगर हददीतील गणेश मंडळाची बैठक घेतले बाबत**

दिनांक ४.०९.२०१९ रोजी सायंकाळी १७.३० ते १८.४५ वा चे दरम्यान चंदननगर पोलीस ठाणे हद्दीतील प्रभुश्री मंगल कार्यालय चंदननगर या ठिकाणी गणपती उत्सवा निमित्त माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग यांचे अध्यक्षतेखाली गणेश मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर मिटिंग साठी पोलीस ठाणेकडील महिला दक्षता कमिटी,शांतता कमिटी तसेच पोलीस मित्र यांची गणेशोत्सवाचे अनुषंगाने बैठक घेवुन मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कृष्णा इंदलकर यांनी १) गणेश उत्सव साजरा करताना दोन स्पिकर बॉक्स पेक्षा जास्त स्पिकर लावण्यात येवू नये २) डी जे डॉल्बीचा वापर करण्यात येवू नये आवाजाची तिव्रता वाढल्यास ध्वनी प्रदुषण कायदयान्वये कारवाई करण्यात येईल तसेच मिरवणुकी दरम्यान पारंपारिक वाद्याचा उपयोग करावा ३) वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. ४) सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसवावेत मुर्तीच्या संरक्षणासाठी २४ तास स्वयंसेवक नेमावेत ५) मुख्य मिरवणूकीत सामील होणा-या मंडळांनी आपल्या सजावटीचा आकार कमी करावा ६) गणपती मंडळांनी मिरवणुकीत ट्रेलर चा आकार नियमाप्रमाणे असावा ७) श्री मुर्तीचे अग्णी पासुन व पावसापासून संरक्षण होईल याची दक्षता घ्यावी ८) विद्युत कनेक्शन नेहमी तपासावे ९) धर्मदाय आयुक्त यांच्याकडे मंडळाची नोंदणी करावी १०) मंडळा करीता वर्गणी गोळा करताना कोणत्याही नागरीकांस त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी ११.गणेशोत्सव काळात मंडपा खाली काही लोक पत्यांचा जुगार खेळतात व इतर गैरप्रकार करतात ते करुन नये तसे अढळयास सदर मंडळावर व लोकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल १२) मिरवणुकी दरम्यान कोणत्याही ज्वालागृही पदार्था सहयाने आगीचा लोळ हवेत सोडण्यास सक्त मनाई आहे. तसेच जाती धर्मा विरुध्द घोषणाबाजी व निदर्शने /पत्रके वाटू नये व गणेश उत्सव शांततेत पार पाडावा पोलीस ठाणे हद्दीत कोणताही अनुचित प्रकार दिसुन आल्यास त्याबाबत आम्हास तात्काळ कळविणे बाबत अवाहन केले आहे.

सदर बैठकीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कृष्णा इंदलकर,पीएसआय श्री भोसले , पीएसआय श्री जाधव यांच्यासह महिला दक्षता कमिटी,शांतता कमिटी तसेच पोलीस मित्र व गोपनीयचे कर्मचारी यांच्यासह गणपती उत्सव साजरा करणा-या मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्ते असे एकुण २०० ते २५० जनसमुदाय हजर होते.